
॥ श्रीगुरु:शरणम् ॥

# ॥ श्रीदत्तमहाराज कवीश्वर महिम्नः स्तोत्रम् ॥



॥ वेदशास्त्रसंपन्न न्यायचूडामणी विद्यावाचस्पती महामहोपाध्याय
राष्ट्रीय पंडित परमपूज्य ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर ॥

# ।। श्रीदत्तकवीश्वरमहिम्नः स्तोत्रम् ।।

प्रा. डॉ. सौ. उमा देशपांडे

# ।। श्रीदत्तकवीश्वरमहिम्नः स्तोत्रम् ।।

**श्रुतिस्मृतिपुराणानामालयं करुणालयम् ।**
**वन्दे कवीश्वरं नित्यं श्रीदत्तं सद्गुरुं वरम् ।।१।।**

श्रुति, स्मृति आणि पुराणे ह्या संस्कृतभाषेतील दैवी धार्मिक वाङमयाचे गाढे विद्वान आणि दयेचे सागर असणाऱ्या श्री दत्त कवीश्वर महाराजांना नमस्कार असो.

**पवित्रं दर्शनं यस्य पावनं स्मरणं तथा ।**
**शक्तिदं सन्निधानं तद् श्रीदत्तस्य महात्मनः ।।२।।**

ज्यांचे दर्शन पवित्र आहे तसेच स्मरणही पवित्र आहे आणि ज्यांच्या सहवासांत रहाण्यामुळे दैवी शक्तिचा लाभ होतो असे श्री दत्तमहाराज महान योगी आहेत.

**वचनं मधुरं यस्य श्रीदत्तस्य परात्मनः ।**
**उद्बोधकं च व्याख्यानं युक्तिबुद्धिप्रबोधकम् ।।३।।**

परमेश्वरस्वरुप अश्या श्री दत्त कवीश्वर महाराजांची प्रवचने मधुर (भक्तीपूर्ण) असून त्यांचे शब्द भौतिक आणि पारमार्थिक जीवनांत सुयोग्य मार्ग सूचविणारे असतात.

**अध्यात्मज्ञाननिरतं लोककल्याणसंभृतम् ।**
**सत्कार्य लोकभद्राय तस्य श्रीदत्तयोगिनः ।।४।।**

श्री दत्त कवीश्वर महाराजांची सत्कार्ये अध्यात्मज्ञानाने परिपूर्ण असूनहि भौतिकदृष्ट्या लोककल्याणासाठी असतात. असे ते लोकांच्या कल्याणासाठी कार्यरत रहाणारे कर्मयोगी आहेत.

**अकारणदयासिन्धुः परदुःखप्रदाहकः ।**
**मातृवद्वत्सलो धीमान् श्रीदत्तः परमार्थदः ।।५।।**

भक्तांनी अगदी कळवळून विनंती न करताहि, सहज प्रेमाने कृपा करणारे असे दयेचे सागर आणि त्यांची दुःखे नष्ट करणारे श्री दत्त कवीश्वर महाराज आपल्या सर्वांची गुरुमाऊली असूनहि आपणास बौध्दिक शब्दांद्वारे परमार्थाचे मार्गदर्शन करतात.

**अचतुर्वदनो ब्रह्मा द्विबाहुरपरो हरिः ।**
**अभाललोचनः शम्भुः श्रीदत्तो नः शुभंकरः ।।६।।**

श्री दत्त कवीश्वर महाराज, चार मुखे नसली तरी ब्रह्मदेवासमान आहेत, दोन हात असलेल्या श्री विष्णुसमान आहेत, आणि त्यांचे कपाळामध्ये तिसरा नेत्र नसला तरी शंकरासमान आहेत. असे श्री दत्त कवीश्वर महाराज आम्हा सर्वांचे कल्याण करोत.

**राजते पण्डितो योगी रससिध्दः कवीश्वरः ।**
**नास्ति तस्य यशःकाये जरामरणजं भयम् ।।७।।**

संस्कृत भाषा आणि वाङमयांतील धार्मिक आणि तत्त्वज्ञान स्वरुप ज्ञानाचे प्रकाण्ड पंडित शोभणारे श्री दत्त कवीश्वर महाराज रससिद्ध योगी अशी त्यांची कीर्ती आहे व त्यांच्या यशःशरीराला वृद्धत्वाचे व मरणाचे भय नाही. म्हणजे त्यास अमरत्व प्राप्त झालेले आहे.

**जयस्तस्य यशस्तस्य सत्कीर्तिः शाश्वती प्रभा ।**
**भ्राजते हृदये यस्य श्रीदत्तस्य परमेश्वरः ।।८।।**

अश्या श्री दत्तमहाराजांचे गुरुस्थान ज्या भक्तांचे हृदयांत आहे त्या भक्तांना जय, यश, सत्कीर्ती आणि तेज वगैरे श्री दत्त कवीश्वर महाराजांच्या कृपेने प्राप्त होते.

**नमोऽस्तु श्रीदत्त प्रशान्तचित्त ।**
**असंख्यभक्तार्चितपादपद्म ।।**
**श्रीवासुदेवस्य परस्य धाम ।**
**प्रकाशितम् अक्षरसिद्धस्थानम् ।।९।।**

प्रशान्तचित्त अश्या श्रीदत्त कवीश्वर महाराजांची असंख्य भक्त पाद्यपूजा करतात. ह्या योगीराजांनी त्यांचे सद्गुरु प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांना परमधाम (ईश्वरस्वरुप) मानून त्यांनी, त्यांच्या लिहिलेल्या (विरचित) दिव्य अश्या धार्मिक आणि तत्त्वज्ञानसिध्द अश्या वाङमयाचे प्रकाशन केले आहे.

**भारती यस्य जिव्हाग्रे करयोर्दानश्रीस्थिता।**
**श्रीदत्तं सादरं वन्दे वाग्मिनं योगिसद्गुरुम् ।।१०।।**

प्रत्यक्ष श्री सरस्वतीदेवीचा वास ज्यांच्या जिभेवर आहे आणि ज्यांच्या करकमलाद्वारे अमाप धनाचे दान झालेले आहे अशा त्या पंडित योगीराज सद्गुरु श्रीदत्त कवीश्वर महाराजांना आम्ही सादर नमस्कार करतो.

**कुलं पवित्रं जननी कृतार्था ।**
**भद्रास्पदा पुण्यमयी च भूमिः ।।**
**विराजते भारतमातृशक्तिः ।**
**श्रीदत्तप्रज्ञानप्रभामयूखैः ।।११।।**

पूज्य श्रीदत्त कवीश्वर महाराजांमुळे त्यांचे कुल पवित्र झाले आहे आणि त्यांच्या मात्यापित्यासहि धन्य झाल्यासारखे वाटले असावे. त्याचप्रमाणे त्यांच्या कर्मभूमीसहि खूप चांगले असे पुण्यकर्म घडल्यासारखे वाटले असावे. त्याच भारतामध्ये मातृशक्तिस शोभेचे स्थान आहे तेथे पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांच्या ज्ञानाचे तेजहि सर्वमान्य आहे.

**प्रतिपच्चन्द्रबिम्बेव वर्धमानाय भूतले ।**
**कवीश्वराय दत्ताय नमः शान्ताय तेजसे ।।१२।।**

ज्याप्रमाणे पृथ्वीवरुन आपणास दिसणाऱ्या प्रतिपदेच्या चंद्राचे स्वरुप रोज मोठे होत असून पौर्णिमेस पूर्ण-चंद्र स्वरुप होते त्याप्रमाणेच पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांचे शीतल आणि शान्त असे तेज प्रतिदिन वृद्धिंगत होत असल्याचे भक्तांना जाणवते.

**लोकानां सुखबोधाय परावाणी प्रवर्तते ।**
**अस्य श्रीदत्तरूपस्य कवीन्द्रस्य परात्मनः ।।१३।।**

आपल्यासारख्या भक्तांना सुख-समृद्धिचा लाभ व्हावा यासाठी पूज्य सद्‌गुरु श्री दत्त कवीश्वर महाराज त्यांच्या दिव्य वाणीने मार्गदर्शन करीत असतात, असे श्री दत्त कवीश्वर महाराज आपणासाठी प्रगल्भ ज्ञानी असणारे परमेश्वरस्वरुप आहेत.

**बोधनार्थं च धर्मस्य रक्षणार्थं च संस्कृतेः ।**
**संवर्धनाय गैर्वाण्याः श्रीदत्तो यतते सदा ।।१४।।**

आपल्या वैदिक धर्माची रहस्य समजावून सांगणारे व त्याप्रमाणे आपल्या वैदिक संस्कृतिचे रक्षण करणारे असे पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराज संस्कृत भाषा आणि वाङमयाची जोपासना करण्यासाठी सदैव प्रयत्न करीत आहेत व त्यासाठीच प.प. सद्‌गुरु श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराजांच्या समग्र व दैवी संस्कृत वाङमयाचे प्रकाशन कार्य केले आहे.

**श्रीदत्तो वरदः सदा विजयते दत्तं भजे सर्वदा ।**
**श्रीदत्तेन सुरक्षिता च विबुधा दत्ताय तुभ्यं नमः ।।**
**श्रीदत्तात् ननु नास्ति तत्त्वमपरं दत्तेऽस्तु बुद्धिः स्थिरा ।**
**श्रीदत्ते विलयोऽस्तु सर्वमतिनां हे दत्त मामुद्धर ।।१५।।**

पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराज सतत आशीर्वाद देत असतात म्हणूनच आपण त्यांचा जयजयकार करावा आणि त्यांचे चिंतन करावे. ज्यांनी अनेक

प्रज्ञावंत संस्कृतभाषा पंडितांचे संवर्धन व संरक्षण केले आहे अश्या त्या श्री दत्त कवीश्वर महाराजांना आमचा नमस्कार असो. आमच्यासाठी अेकमेव श्री दत्त कवीश्वर महाराज हेच आमचे गुरुमहाराज (गुरुतत्त्व) असल्यामुळे आम्ही त्यांचे चरणी आमची बुद्धी स्थिर करतो आणि आम्हा सर्वांच्या विचार-शक्तिचा विलय त्यांच्या चरणी व्हावा व त्या सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांनी आमचा उद्धार करावा अशी प्रार्थना करतो.

**स्मरणमर्चनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।**
**श्रीदत्तकीर्तनं नित्यं भुक्तिमुक्तिप्रदायकम् ।।१६।।**

नवविधा भक्ति प्रकारामध्ये उल्लेख केलेल्या भक्ति पद्धतीप्रमाणे आम्ही श्री दत्त कवीश्वर महाराजांचे स्मरण, पूजन, दैनंदिन सेवा त्याचप्रमाणे त्यांच्या (म्हणजे त्यांच्या प्रतिमेसमोर) सर्वांनी बसून स्तोत्रे-भजनें म्हणावीत व त्याचप्रमाणे आपणासर्वांची सुख-दुःखे त्यांना निवेदन करुन त्यांचे मार्गदर्शन घेणे, अश्या प्रकारे त्यांची भक्ति करतो. श्री दत्त कवीश्वर महाराजांचे रोज भजन-किर्तन करणे, त्यामुळे सांसारिक जीवनांत मुक्तिदायक असते.

**कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिन्द्रियैरपि ।**
**प्रज्ञानं परमं सेव्यं श्रीदत्तं योगिसद्गुरुम् ।।१७।।**

आपण सर्व भक्तांनी पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांची शरीराने, मनाने, बुद्धिने आणि सर्व इन्द्रियांद्वारे सेवा करावी असे हे प्रकाण्ड पंडित श्री दत्तमहाराज योग्यांचेहि सद्गुरु शोभावेत असे आहेत.

**जातं वंशे सकलविदिते मान्यविद्वद्वराणां ।**
**विख्यातं तं विबुधमतिदं योगविद्याप्रकाशम् ।।**
**तं श्रीदत्तं सकलसुखदं प्रार्थये पूर्णप्रज्ञं ।**
**भूयाद् भक्तिप्रवणमनिशं जीवनं नः परार्थम् ।।१८।।**

परमपूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांचा जन्म सन्मान्य अश्या विद्वान कुटुंबामध्ये झालेला आहे, हे आपणा सर्वांना माहीत आहेच. त्यांच्या तेजस्वी

बुद्धिमत्तेमुळे ते संस्कृतभाषा पंडितांमध्येहि सुप्रसिद्ध असून ते योगविद्येचा प्रचार करणारे सद्गुरु असल्यामुळे आपल्यापैकी अनेकांनी गुरुमंत्र घेतला आहे (दिक्षा घेतली आहे.) त्यावेळच्या ह्या ''सहस्रचंद्र दर्शन शांति'' निमित्ताने आपण अशी प्रार्थना करावी की- पूर्णप्रज्ञ श्री दत्त कवीश्वर महाराजांचे ह्यापुढील जीवन भक्तिमार्गाकडे आणि परमार्थाकडे मार्गदर्शन करणारे ठरो.

**परित्राणाय भक्तानां पालनार्थं च ज्ञानिनाम् ।**
**रक्षणार्थं च छात्राणां जीवनं दत्तसद्गुरोः ।।१९।।**

ईश्वरस्वरुप सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांचे अस्तित्व हे आपणा सर्व भक्तांच्या रक्षणासाठी आणि ज्ञानी पंडितांची प्रगती करवून घेण्यासाठी त्याचप्रमाणे संस्कृतभाषा, साहित्य, तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी व्यतीत होत आहे.

**यः पुमान् भजते नित्यं श्रीदत्तं कविसद्गुरुम् ।**
**भक्तिमुक्तिमयं तस्य चरितं शेमुषीमयम् ।।२०।।**

जी व्यक्ति पूज्य कविश्रेष्ठ सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांचे रोज स्मरण करते त्या व्यक्तिचे जीवन भीतीपासून मुक्त होऊन बौद्धिकदृष्ट्या तेजस्वी होते आणि अश्या तऱ्हेने ती व्यक्ति मुक्तिमार्गाकडे जाते.

**पण्डितोऽयं परं ज्ञानी दाताऽयं सकलार्थदः ।**
**वक्ताऽयं सर्वशास्त्राणां श्रीदत्तः कविशार्दुलः ।।२१।।**

पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराज संस्कृत भाषा, वाङमय, धर्म, तत्त्वज्ञान क्षेत्रांत अत्यंत उच्च कोटीचे प्रकाण्ड पंडित मानले जातात. त्यांच्या वाणीचा सर्व धर्मशास्त्रांवर संपूर्ण अधिकार असणारे ते एकमेव वक्ते आहेत. त्याचप्रमाणे ते अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे संस्कृत कवि आहेत. ह्याबरोबर ते प्रेमळ दानी असून आपल्या गरजा भागवितात.

**शान्ताकारं विमलमतिदं भक्तनाथं वरेण्यम् ।**
**सर्वाधारं सकलसुखदं शान्तवृतिं सुकान्तम् ।।**
**स्वात्मानन्दं परमनिरतं दीक्षितैर्ध्यानगम्यम् ।**
**वन्दे दत्तं विबुधसदृशं योगिनामप्यगम्यम् ।।२२।।**

परमपूज्य सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराज सदैव शान्त असतात व भक्तांचे रक्षण करणारे आणि भक्तांना निर्मळ बुद्धि देणारे असे सर्वश्रेष्ठ गुरु आहेत. आपणा सर्व भक्तांना आधार आणि सर्व प्रकारची सुखे प्राप्त करवून देणारे सद्गुरु स्वतः संसारात असूनहि शान्त वृत्तिचे परन्तु अत्यंत तेजस्वी पंडित आहेत. स्वतःच्या आत्मस्वरुपांत आनंदी असणारे अत्यंत बुद्धिमान योगीस्वरुप आहेत. योगी पुरुषांनाहि अगम्य (न कळणारे) परमेश्वर स्वरुप अश्या श्री दत्त कवीश्वर महाराजांना नमस्कार करु.

**एतद्देशप्रसूतस्य सकाशाद् दत्तयोगिनः ।**
**स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वदेशिकाः ।।२३।।**

आपल्या भारत देशांत जन्म घेतलेल्या पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांकडून स्वतःचे ज्ञान आणि चारित्राची वृद्धि करणारे बरेचसे त्यांचे शिष्य त्यांच्या उपदेशांचा प्रचार करीत आहेत.

**अमृतानुभवं कुर्वन् गीताशास्त्रार्थवित्तमः ।**
**ज्ञानेशसदृशो धीमान् श्रीदत्तः कविपुङ्गवः ।।२४।।**

भगवद्गीतेचा शास्त्रशुद्ध अर्थ व्यवस्थितप्रकारे समजावून सांगणारे व त्यायोगे दैवी शब्दांचा जणू अमृतानुभव करविणारे सद्गुरु कवी श्री दत्त कवीश्वर महाराज पूज्य ज्ञानेश्वरांसारखे तेजस्वी शब्दयोगी आहेत.

**मेधावी च विरागी च धृतिबलतपोयुतः ।**
**रामदासेव श्रीदत्तः लोकानां पथदर्शकः ।।२५।।**

पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराज प्रखर बुद्धिमान आणि संसारांत राहूनहि प्रखर वैराग्यशील, धैर्यवान आणि तपस्वी योगी आहेत. ते सदैव सद्गुरु

रामदासांसारखे निरनिराळ्या गावांमध्ये जाऊन भक्तजनांना भक्तिमार्गाची दीक्षा देतात व मार्गदर्शन करीत आहेत.

**अभंगरचना यस्य भक्तिज्ञप्तिसुसंयुता ।**
**तुकारामस्तथा सोऽयं श्रीदत्तो हरिगायकः ।।२६।।**

पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांनी लिहिलेली भक्तिकाव्ये संतश्री तुकाराम महाराजांच्या अभंगासारखी ज्ञान, भक्ति आणि कर्ममार्गांच्या उपदेशांनी परिपूर्ण आहेत, असे हे आपले सद्गुरु ईश्वर भक्त (हरिभक्त) आहेत.

**अपारे मर्त्यसंसारे प्रभुरेकः कवीश्वरः ।**
**प्रज्ञावान् भक्तिमान् श्रीमान् लोकानां च सदाश्रयः ।।२७।।**

अपरंपार अश्या ह्या दुःखी संसारामध्ये पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराज हेच आपणा भक्तांचे मार्गदर्शक सद्गुरु आहेत. अत्यंत तेजस्वी प्रकांड पंडित आणि भक्तहृदयी सद्गुरु हे आपणां सर्व भक्तांना आश्रय देणारे (म्हणजे सांभाळून घेणारे) आहेत.

**स्वगृहे पूज्यते श्रेष्ठः स्वदेशे लोकनायकः ।**
**श्रीमत्कवीश्वरो दत्तो सदा सर्वत्र पूज्यते ।।२८।।**

प्रख्यात सुभाषितांमध्ये सांगितल्याप्रमाणे श्रीमंत व्यक्तिची पूजा (आदर) त्याच्या स्वतःच्या गांवामध्ये होत असते त्याचप्रमाणे एखाद्या राजाची (महाराजा सयाजीराव गायकवाडांसारख्या) पूजा (आदर) त्यांच्या राज्यांत होत असते, परन्तु पूज्य सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांची पूजा (खरोखर पूजा) सर्व ठिकाणी आणि सदाकाळ होत असते.

**आपदामपहर्तारं दातारमिष्टसंपदाम् ।**
**श्रीदत्तं सद्गुरूं वन्दे सच्चिदानंदविग्रहम् ।।२९।।**

आपणा सर्व भक्तांच्या संकटांचे हरण करणारे आणि आपल्या ईच्छांप्रमाणे (गरजांप्रमाणे) सर्व काही घडवून आणणारे आपले सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराज सच्चिदानंद स्वरुप संत आहेत.

**असिधाराव्रतं येन धृतं श्रीदत्तयोगिना ।**
**ईशस्य स्मरणं पुण्यमनिशं धर्मसेवनम् ॥३०॥**

तलवारीच्या धारेसारख्या लखलखीत तेजस्वी जीवन धारण करणारे पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराज रात्रंदिवस ईश्वर स्मरणामध्ये आणि वैदिक धर्मचिन्तनामध्ये मग्न असतात.

**परिवर्तिनि संसारे तत्त्वमेकं सदात्मकम् ।**
**प्रपत्तिज्ञानसंपूर्ण श्रीदत्ताख्यं परात्परम् ॥३१॥**

ह्या सतत बदलणाऱ्या सांसारिक जीवनामध्ये सत्याने परिपूर्ण तत्त्व म्हणजे ईश्वर स्वरुप हेच श्रेष्ठ मानले जाते. ह्या ईश्वर स्वरुपास शरण जाण्याचे परिपूर्ण ज्ञान असणारे असे आपले पूज्य सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराज आहेत.

**यत्र भक्तिः श्रीदत्तस्य तदीयं चिन्तनं सदा ।**
**तत्र श्रीविजयो मुक्तिः शान्तिस्तुष्टिश्च सर्वदा ॥३२॥**

जेथे जेथे प्रभु श्री दत्तात्रयांचे सदैव नामस्मरण, भजन, कीर्तन होत असते तेथे (त्या भक्तांना) संपत्ती, विजय, मोक्ष, शांति आणि तृप्तिची प्राप्ति होते अशा पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांचा उपदेश असतो.

**वयं सर्वे नमस्कुर्मः सादरं नतकन्धराः ।**
**श्रीदत्तं पुण्यश्लोकं च स्वात्मानन्दं कवीश्वरम् ॥३३॥**

आपण सर्व भक्तांनी नतमस्तक होऊन आत्मानंदामध्ये म्हणजे ईश्वर-स्वरुपांत रममाण असणाऱ्या पुण्यश्लोक सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांना सादर नमस्कार करावा.

**सत्यं ज्ञानमनन्तं तत् तत्त्वं चैतन्यरुपकम् ।**
**आविर्भूतं च तन्नूनं श्रीदत्तात्रेयविग्रहम् ॥३४॥**

सत्यस्वरुप, ब्रह्मज्ञानस्वरुप, अनन्त चैतन्यस्वरुप म्हणजे खुद्द ईश्वर

तत्त्वच सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांच्या देहाद्वारे प्रगट झाले आहे, अशी माझी श्रध्दा आहे.

**यस्य देवे परा भक्तिः यथा देवे तथा गुरौ ।**
**अलौकिकं च माहात्म्यं तं वन्दे दत्तसद्गुरुम् ।।३५।।**

ज्यांची परमेश्वराच्या ठायी परम (अतिशय) भक्ति आहे आणि जे स्वतः आपल्या दृष्टिने देवस्वरुप सद्गुरु आहेत त्या अलौकिक महात्म्यास म्हणजे पूज्य सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांना मी नमस्कार करते/ करतो. (आपण सर्व भक्तांनीहि नमस्कार करावा.)

**प्रज्ञानं ब्रह्म यो वेत्ति परमानंदरुपिणम् ।**
**श्रीदत्तं सद्गुरुं वन्दे भक्तकल्याणकारकम् ।।३६।।**

परमानन्द स्वरुप म्हणजे ईश्वरस्वरुपाचे उच्च कोटीचे ज्ञान असणारे ब्रह्मज्ञानी पूज्यश्री दत्त कवीश्वर महाराज भक्तांच्या कल्याणासाठी सदैव तत्पर असतात, अशा श्री सद्गुरुंना आपण सर्वांनी नमस्कार करावा.

**सर्वं खल्विदं ब्रह्म येन साक्षात्कृतं तथा ।**
**सर्वलोकसमानं तं वन्दे श्रीदत्तसद्गुरुम् ।।३७।।**

हे सर्व जग म्हणजे खरोखरीचे ब्रह्मस्वरुप आहे अशा ज्यांना साक्षात्कार झालेला आहे व त्यामुळेच जगातील सर्व लोकांना समान मानणाऱ्या अश्या परमपूज्य सद्गुरु श्री दत्त महाराजांना आपण नमस्कार करुया.

**आनन्दं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन ।**
**भास्वरं राजते रूपं कवीश्वरसदाश्रयम् ।।३८।।**

वस्तुनिष्ठ किंवा भोगनिष्ठ आनंदाच्या पलिकडच्या ईश्वर स्वरुपाची जाणीव झालेल्या अश्या ब्रह्मानंदात वावरणारे, पंडित योग्यांना कधीहि भीति किंवा काळजी असत नाही. ("अभयं सत्त्वसंशुध्दि ज्ञानियोग व्यवस्थिती" असे

श्री भगवद्गीतेत सांगितले आहे.) निर्भय, तेजस्वी अश्या रुपधारण करणाऱ्या श्री दत्त कवीश्वर महाराजांचा आपणास सदा आश्रय (म्हणजे मानसिक सहवास) लाभावा ही प्रार्थना.

**ईशावास्यमिदं सर्वं येन ज्ञातं यथार्थतः ।**
**योगदीक्षाकरं कार्यं तस्य भेदाभिवर्जितम् ।।३९।।**

हे सर्व जग परमेश्वराने व्याप्त आहे असे ज्यांनी संपूर्णपणे जाणले आहे, ते कुठल्याहि प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना योगदीक्षा देतात, अश्या या परमपूज्य सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांना नमस्कार करुया.

**तज्जलान् इति यः शान्त भजते परमेश्वरम् ।**
**श्रीदत्तो रमते भूयान् तस्मिन् दृष्टे परावरे ।।४०।।**

ज्या परमेश्वरापासून ह्या जगाची निर्मिती होते आणि लय होतो त्या शान्तस्वरुप परमेश्वराच्या चिंतनात आपले सद्गुरु परमपूज्य श्री दत्त कवीश्वर महाराज सदैव मग्न असतात.

**तत्त्वमसीति यः शिष्यं प्रबोधयति तत्परम् ।**
**आनंदयति प्रकृष्टं श्रीदत्तो नन्दनन्दनः ।।४१।।**

''तत्त्वमसि'' ह्या उपनिषदातल्या वाक्याला अनुसरुन जे आपल्या शिष्यांना अत्यंत तत्परतेने प्रबोधन करतात (म्हणजे ज्ञान देतात.) अश्या त्या सद्गुरु श्री दत्त महाराजांच्या स्वरुपाचे दर्शन घेतल्यानंतर आपणा भक्तांना उत्कृष्ट प्रकारचा आनंद होतो कारण ते स्वतः आनंद (नंदनन्दन) स्वरुपच आहेत.

**कामक्रोधवियुक्तस्य दत्तस्य यतचेतसः ।**
**अभितो ब्रह्म परमात्मा वर्तते विदितात्मनः ।।४२।।**

काम, क्रोध वगैरे व्याधिंपासून मुक्त झालेल्या आणि स्वतःच्या मनावर संपूर्ण नियंत्रण असणाऱ्या अशा आपल्यां पूज्य श्री सद्गुरु दत्त कवीश्वर

महाराजांच्या आजुबाजुस आणि देहामध्येहि परब्रह्म परमेश्वराचा निवास त्यांच्या अन्तरात्म्यांत आहे अशी आपणास जाणीव होते.

**कवीश्वरो हि भक्तानां हृद्देशे ननु तिष्ठति ।**
**बोधयन् स्वात्मसौख्यं तान् मन:शांतिप्रदायकम् ।।४३।।**

श्रीमद्भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे आपले सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांचे अधिष्ठान सर्व भक्तांच्या हृदयांत असावे ज्यामुळे आपणास आत्म्याच्या आनंदाची बोध प्राप्ति होते व त्याबरोबरच मनास दैवी अशी शान्तता प्राप्त होते.

**यस्य नाहंकृतो भावो मेधा यस्य सुमंगला ।**
**विराजते श्रीदत्तोऽयं विद्यावाचस्पतिर्महान् ।।४४।।**

ज्यांचा मनांत अहंकाराचा भाव मुळीच नाही आणि ज्यांची बुध्दी अत्यंत तेजस्वी असून उत्कृष्ठ साहित्य निर्माण करणारी आहे, असे ते आपले सद्गुरु श्री दत्तकवीश्वर महाराज उच्च कोटीचे विद्यावाचस्पति संबोधनाने सर्व भारतात शोभून दिसत आहेत. (पूज्यश्रींना संस्कृत वाङमय सेवेबद्दल त्यांना राष्ट्रपति पुरस्काराने सन्मानित केले आहे आणि भारतीय प्राच्य विद्यासंस्थेनेहि सन्मानित केले आहे.)

**पुण्यप्रभावाय प्रशांतचेतसे ।**
**प्रज्ञानरुपाय परार्थदायिने ।।**
**विशालचित्ताय श्रीदत्तमूर्तये ।**
**नमस्ते पुरस्तादथ पृष्ठतश्च ।।४५।।**

ज्यांचा प्रभाव आपणा सर्वांना पुण्यकारक आहे आणि ज्यांचे मन अतिशय शान्त आहे अशा तेजस्वी, ज्ञानस्वरुप श्री सद्गुरु दत्त कवीश्वर महाराजांचे मनहि अतिशय मोठे म्हणजे दयाशील आणि प्रेमळ असे आहे. अश्या आपणा सर्वांना परमार्थ मार्गदर्शन करणाऱ्या श्री दत्त कवीश्वर सद्गुरुंना आपण सर्व नमस्कार करुया.

**विरक्तिः सत्त्वशुद्धिश्च स्वात्मज्ञप्तिश्च मुक्तिदा ।**
**श्रीमत्कवीश्वरौ नित्यं लसन्ति गुणसम्पदः ।।४६।।**

संपूर्ण वैराग्य व शुद्ध आणि सात्विक मन असणारे आणि ज्यांनी स्वत:च्या आत्म्याला समजावून घेऊन जीवनमुक्तता प्राप्त केली आहे असे आपले परम सद्‌गुरु श्री दत्त कवीश्वर महाराज ह्या आणि इतर अनेक सद्‌गुणांनी शोभून दिसतात.

**यस्य सर्वे समारम्भाः कामसंकल्पवर्जिताः ।**
**लोककल्याणसंयुक्ताः श्रीदत्ताय नमो नमः ।।४७।।**

ज्या सद्‌गुरुंनी केलेली सर्व धार्मिक कार्ये आणि समारंभ स्वत:साठी नसून फक्त लोकांच्या म्हणजे आपल्या भक्तांच्या कल्याणासाठी संकल्पयुक्त असतात. अश्या त्या सद्‌गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांना आपला नमस्कार असो.

**वीतरागभयक्रोधः सर्वकल्याणकारकः ।**
**श्रीदत्तः सद्‌गुरुविश्वे सर्वश्रेष्ठश्च तत्त्वविद् ।।४८।।**

ज्यांच्या मनामधून काम, क्रोध आणि भय असे शत्रु नष्ट झाले आहेत आणि जे फक्त सर्वांचे (आपल्या भक्तांचे) कल्याणकारण आहेत असे सद्‌गुरु श्री दत्त कवीश्वर महाराज आपल्या जगामध्ये एक उच्चकोटीचे तत्त्वचिंतक मानले जातात.

**श्रीदत्तो वेदधर्मात्मा श्रोत्रियो ब्रह्मश्रीयुतः ।**
**सो नित्यं प्रतिजानीते न मे भक्तः प्रणश्यति ।।४९।।**

परमपूज्य सद्‌गुरु श्री दत्त कवीश्वर महाराज वैदिक धर्माचे ज्ञानी असून त्याप्रमाणे श्रुतींचे (वेदांचेहि) ब्रह्मज्ञानी आहेत. गीतेमध्ये श्रीकृष्णाने दिलेल्या वचनाप्रमाणेच आपल्या नकळत ते स्वत:च्या भक्तांना असा आशीर्वाद देतात की त्यांच्या स्मरणामुळे आपणांस कुठल्याहि प्रकारच्या यातना होणार नाहीत.

**अनपेक्ष: शुचिर्दक्ष: सर्वेषां मार्गदर्शक: ।**
**निरासक्तश्च निर्दम्भी श्रीदत्त: परपीडहा ।।५०।।**

ज्या सद्गुरुंना कुठच्याहि बाबतीत कुठलीहि अपेक्षा नाही, जे पवित्र आणि ईश्वरकार्यासाठी सदैव तत्पर असतात आणि सर्वांना मार्गदर्शन करतात, असे आपणा सर्वांचे सद्गुरु परमपूज्य श्री दत्त कवीश्वर महाराज संपूर्ण निरासक्त आणि निर्दंभी व नम्र असे आहेत. आणि आपल्या सर्व भक्तांची दु:खे दूर करण्यासाठी ते सदैव तत्पर असतात.

**युक्ताहारविहारस्य योगिनो मितभाषिण: ।**
**कवीश्वरश्रीदत्तस्य परार्थे जीवनं परम् ।।५१।।**

आपल्या सद्गुरुंचे जीवन बंधनयुक्त आणि साधे असून ते शक्यतो मौन अवस्थेत असतात. अशा आपल्या श्री दत्तकवीश्वर महाराजांचे जीवन आपल्या भक्तांचे कल्याण करण्यासाठी मार्गदर्शक ठरणारे आहे.

**प्रजहाति च य: कामान् परेशं सेवते सदा ।**
**आत्मन्येवात्मनस्तुष्ट: श्रीदत्तो कविशार्दुल: ।।५२।।**

ज्यांनी सर्व इच्छांचा संपूर्ण त्याग केला आहे आणि जे सदैव ईश्वरसेवेत मग्न असून आध्यात्मिक विचारांमध्येच रममाण असतात असे आपले सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराज तेजस्वी काव्य रचनाकार आहेत.

**यज्ञानां जपयज्ञोऽस्मि यदुक्तं कृष्णयोगिना ।**
**क्रियते तदनुष्ठानं श्रीदत्तेन निरन्तरम् ।।५३।।**

श्रीकृष्णप्रभुंनी श्रीभगवत् गीतेत सांगितले आहे की इतर सर्व यज्ञयागापेक्षा नामस्मरण करणे (म्हणजे जपयज्ञ) हेच ईश्वर सेवेचे उच्चतम साधन आहे, ह्या उक्तिप्रमाणे आपले पूज्य सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराज सदैव ईश्वर अनुष्ठानात (चिंतनात) मग्न असतात अश्या त्या सद्गुरुंना आपला सदैव प्रणाम असो.

यद्यद् विभूतिमत्सत्त्वं भद्रं कल्याणसुन्दरम् ।
प्रत्यक्षं दृश्यते नित्यं दत्तरूपेण मङ्गलम् ।।५४।।

ज्या ज्या थोर व्यक्ति सत्त्वशील, चांगल्या कृती करणाऱ्या व कल्याणकारी आणि सुंदर असतात (सुंदर म्हणजे योगीस्वरुप असतात) अश्या आपल्या सद्‌गुरुंचे दर्शन श्रीदत्त रुपासारखे सर्वांगाने मंगलदायक असते.

प्रारब्धं लोकतीर्थेन प्रभुणा शक्तिदायकम् ।
संवर्धितं च तत्कार्यं श्रीमद्वामनयोगिना ।।५५।।

सद्‌गुरु श्री लोकनाथतीर्थस्वामी महाराजांनी सुरु केलेले शक्तिपात योगदीक्षेचे कार्य पूज्य गुरु श्री वामन महाराजांनी पुढे प्रचारांत आणले आहे. (पूज्य श्री गुळवणी महाराजांकडून अनेक शिष्यांनी शक्तिपाताची दिक्षा घेतली आहे. व आपले सद्‌गुरु श्री दत्त कवीश्वर महाराज श्रीगुरु गुळवणी महाराजांचे पट्टशिष्य आहेत.)

सद्‌गुरोः कृपया नीतं प्रतिष्ठां कर्म पुण्यदम् ।
कवीश्वरश्रीदत्तेन लोककल्याणकारिणा ।।५६।।

अश्या प्रकारे सद्‌गुरु श्री वामन महाराजांचे सर्व भक्तांना शक्तिपाताची दीक्षा देण्याचे पुण्यकर्म प्रतिष्ठा पावलेले होते व तेच प्रतिष्ठित पुण्यकर्म पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांनी आपल्या सारख्या भक्तांना कल्याणासाठी आपणापैकी कांही भक्तांना शक्तिपाताची योगदीक्षा देऊन हे कार्य पुढे नेले.

तीर्थक्षेत्रं कृतं येन श्रीदत्तयोगिना वरम् ।
वासुदेवाश्रमपदं धन्यं विश्रामदायकम् ।।५७।।

परमपूज्य सद्‌गुरुश्री दत्त कवीश्वर महाराजांनी त्यांच्या गुरुंच्या गुरुंचे स्थान म्हणजे पूज्य वामनमहाराजांचे गुरु परमपूज्य श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराजांचे स्थान ''श्रीवासुदेवाश्रम'' हे एक शान्ति देणारे तीर्थक्षेत्रच निर्माण केले आहे.

**धर्मसंस्कृतिकेन्द्रं तत्पुण्यभूमिसुशोभनम् ।**
**प्रख्यातिं परमां नीतं श्रीदत्तगुरुणा शुभम् ।।५८।।**

पुण्यातले श्रीवासुदेवाश्रम हे जसे श्रीगुरुदत्तात्रयांचे आणि परमपूज्य श्री वासुदेवानंदसरस्वतीस्वामींचे स्थान समजले जाते त्याच प्रमाणे ते एक वैदिक धर्म आणि सांस्कृतिक केन्द्र अश्या पुण्यभूमिचे सुशोभित स्थान आहे. श्रीवासुदेवाश्रमांस अश्या प्रकारच्या परमोच्य प्रसिध्दिस परमपूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांच्या कार्यांनीच नेले आहे.

**गायनं यत्र मन्त्राणां पूजनं परमात्मनः ।**
**वासुदेवाश्रमस्थानं पावनं दत्तभूषितम् ।।५९।।**

ह्या वासुदेवाश्रमांत यज्ञ, याग मंत्रांचे जप आणि मोठ्या प्रमाणांत परमेश्वर पूजन होत असते. अश्या प्रकारे पूज्यश्री दत्त कवीश्वर महाराजांनी हे वासुदेवाश्रम एक पवित्र आणि भूषणावह सद्गुरुस्थान निर्माण केले आहे.

**मननं गुरूमन्त्रस्य ध्यानं यत्र परात्मनः ।**
**वासुदेवाश्रमपदं पवित्रं दत्तसेवितम् ।।६०।।**

सद्गुरुंनी दिलेल्या मंत्रांचे जेथे मनन होते आणि परमात्म्याचे जेथे सतत ध्यान होत असते असे हे वासुदेवाश्रम स्थान पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांच्या सेवेने पवित्र झालेले आहे.

**यत्र संकीर्तनं पुण्यम् ईशस्य जगदात्मनः।**
**वासुदेवाश्रमस्थानं राजते दत्तसत्कृतम् ।।६१।।**

जेथे सतत भजन, पूजन करणे हेच पुण्यकर्म आहे आणि जेथे ब्रह्मांडाच्या (जगताच्या) आत्मस्वरुप ईश्वराचा वास आहे असे वासुदेवाश्रम स्थान पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांच्या सत्कार्यांनी सुशोभित झाले आहे.

व्याख्यानं यत्र विदुषां भक्तिश्रद्धासमन्वितम् ।
वासुदेवाश्रमपदम् अद्‌भूतं दत्तमण्डितम् ॥६२॥

सद्‌भक्ति आणि श्रद्धेने युक्त अशी विद्वान-पंडितांची प्रवचने जेथे होत असतात ते वासुदेवाश्रम हे स्थान पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांच्या परिश्रमाने दैवी तीर्थस्थान वाटते.

अन्नदानं महद्दानं विद्यादानं च दीयते ।
वासुदेवाश्रमस्थानं भ्राजते दत्तशोभितम् ॥६३॥

वासुदेवाश्रमांत यज्ञ, याग, पूजा, उत्सवानंतर होणारा महाप्रसाद(म्हणजे अन्नदान) हे एक महाराजांचे पुण्यकर्म आहे. त्याप्रमाणे तेथे विद्यादान, धर्मोपदेश वगैरेहि दिले जाते. अश्या ह्या सत्कर्मामुळे वासुदेवाश्रम हे स्थान पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांनी तीर्थक्षेत्रच निर्माण केले आहे.

यत्र देवी जगन्माता श्रयते शक्तिबुध्दिदा।
वासुदेवाश्रमपदं दृश्यते दत्तभावितम् ॥६४॥

भक्तांना शक्ति आणि बुध्दी अर्पण करणारी देवी जगन्माता (जगदंबा) जेथे निवास करते आहे ते वासुदेवाश्रम हे स्थान पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांच्या कृपेने जगन्मातेचे मंदिरच आहे.

राजते यत्र सानन्दं दत्तात्रेयो जगद्‌गुरुः ।
वासुदेवाश्रमस्थानं भासते दत्तपूजितम् ॥६५॥

जेथे जगतगुरु प्रभु श्रीदत्तात्रय आनंदाने निवास करीत असावेत असे वाटणारे श्रीवासुदेवाश्रम हे स्थान पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांनी केलेल्या दैनंदिन पूजेअर्चेमुळे दिव्य मंदिरासारखे वाटते.

**भगवान् वासुदेवोऽयं दीप्यते यत्र स्वात्मविद् ।**
**वासुदेवाश्रमस्थानं भाति श्रीदत्तकीर्तितम् ।।६६।।**

स्वानुभूतीचा अनुभव ज्यांनी घेतला आहे असे परमपूज्य श्री सद्‌गुरु वासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराज जेथे निवास करीत आहे असे आपणांस वाटते ते वासुदेवाश्रम स्थान श्रीदत्तप्रभुंच्या कीर्तिने आणि श्री दत्त कवीश्वर महाराजांच्या सेवेने सुशोभित झाल्यासारखे वाटते.

**लोकनाथो विभुर्यत्र वर्तते परमो गुरुः ।**
**वासुदेवाश्रमपदं दिव्यं श्रीदत्त संस्थितम् ।।६७।।**

परमपूज्य विभूतीस्वरुप श्री लोकनाथतीर्थस्वामी महाराज तेथे निवास करीत आहेत, अशी श्रध्दा श्रीवासुदेवाश्रम ह्या वास्तुबद्दल बाळगून पूज्य सद्‌गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजहि तेथे रहात असत.

**योगिराट् वामनो यत्र वसति करुणालयः ।**
**वासुदेवाश्रमस्थानं भ्राजते दत्तसंयुतम् ।।६८।।**

सद्‌गुरु योगिराज श्री वामनमहाराज (गुळवणी महाराज) अत्यंत प्रेमळ आणि दयेचा सागर अशा अवस्थेत श्री वासुदेवाश्रमांत असत ह्याची जाणीव सर्व भक्तांना श्री दत्त कवीश्वर महाराज गोष्टी स्वरुपांत करुन देत असत.

**प्रशान्तिदं च संस्थानं देवर्षिमुनिसंश्रितम् ।**
**वासुदेवाश्रमपदं मान्यते दत्तवर्धितम् ।।६९।।**

दिव्य शान्ति देणारे आणि देवर्षिमुनींनी त्यांच्या वास्तव्याने पवित्र केलेले श्रीवासुदेवाश्रम हे संस्थान पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांनी नावारुपास (प्रसिध्दिस) आणले. (साधारणपणे सर्व दत्तभक्त या वासुदेवाश्रमात दर्शनासाठी जातात.)

**सरस्वती च लक्ष्मीश्च सर्वेषां यत्र सौख्यदा ।**
**वासुदेवाश्रमो नाम तीर्थं श्रीदत्तपावितम् ।।७०।।**

ज्या मंदिरस्वरूप वास्तुमध्ये लक्ष्मीचा आणि विशेषत: सरस्वतीचा निवास असल्याने तेथे प्रवचने, संवाद, मंत्रजप, संकीर्तन अशा प्रकारचे ज्ञानयज्ञ आणि इतर विविध उत्सवांमुळे भक्तांना आनंद देणारे श्रीवासुदेवाश्रम हे जणु तीर्थक्षेत्रच असावे असे पवित्रस्थान पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांनी त्यांच्या सर्वांगीण सेवेने निर्माण केले आहे.

**धर्मतत्त्वं यथा नित्यं यथा सच्चिन्मयं परम् ।**
**वासुदेवाश्रमपदं शाश्वतं दत्तमानितम् ।।७१।।**

जेथे सतत धार्मिक आणि वैदिक विषयांवर तात्विक चर्चा होत असते आणि जेथे मनाला परमशान्ति लाभते असे श्रीवासुदेवाश्रम हे स्थान शाश्वत श्रीदत्तक्षेत्र म्हणून प्रसिध्द झाले आहे.

**आनन्दसौख्यदं पुण्यं भद्रं कल्याणमङ्गलम् ।**
**वासुदेवाश्रमपदं शोभते दत्तविश्रुतम् ।।७२।।**

आनंद आणि सौख्य देणारे, पवित्र आणि कल्याणकारी, पुण्यमय आणि मंगल असे श्रीवासुदेवाश्रम हे स्थान परमपूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांच्या निवासामुळेहि सुशोभित झालेले आहे.

**नमस्ते सद्गुरो देव श्रीदत्तकविशार्दुल ।**
**आनन्दमङ्गलं भूयाद् भवद्भक्तस्य सर्वदा ।।७३।।**

श्रीवासुदेवाश्रमांत निवास करणारे प्रकांड पंडित व तत्त्वज्ञानी सद्गुरुश्री दत्त कवीश्वर महाराजांना नमस्कार असो आणि आपल्या सर्व भक्तांचे जीवन आनंदमय आणि मंगलदायी करो हीच आपली सदैव प्रार्थना असावी.

**योगिनामपि सद्योगीं वरिष्ठं ज्ञानिनामपि ।**
**वन्देऽहं सादरं नित्यं श्रीदत्तं कविपुङ्गवम् ।।७४।।**

सर्व योग्यांमध्ये उच्चतम प्रकारचे स्थान प्राप्त झालेले योगीराज त्याचप्रमाणे धार्मिक आणि वैदिक ज्ञानांमध्ये सर्वश्रेष्ठ अधिकारी प्रकांड पंडित आणि संस्कृत साहित्यकारांमध्ये उत्कृष्ट साहित्यकार अशा सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांना आम्ही भक्त नियमित नमस्कार करतो.

**अज्ञं करोति सज्ञानं दरिद्रं लक्ष्मीसंयुतम् ।**
**नमामि श्रद्धया नित्यं श्रीदत्तं योगिसद्गुरुम् ।।७५।।**

आपले परमपूज्य सद्गुरु अज्ञानी असणाऱ्यांना बुध्दी व त्यायोगे यश प्राप्ति करवून देतात, त्याचप्रमाणे गरीब (आर्थिक दृष्ट्या गरीब) असणाऱ्या व्यक्तिंना लक्ष्मी व त्यायोगे सर्व सुखसोयी प्राप्त करवून देतात. अश्या त्या परमपूज्य सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांना आम्ही संपूर्ण श्रध्देने रोज नमस्कार करुन त्यांचेकडे प्रार्थना करतो.

**अनुग्रहो यदीयश्च तुष्टिपुष्टिप्रदायकः ।**
**नमामि सादरं नित्यं श्रीदत्तं ज्ञानिनां वरम् ।।७६।।**

ज्या आपल्या सद्गुरुंचा उपदेश आणि ज्यांची कृपा आपणा भक्तांना सर्व सुखसोयी आणि मन:शांति करवून देणारी आहे, त्या परमपूज्य सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांना कि ज्यांना उच्च कोटीचे ज्ञानी समजतात अश्या सद्गुरुंना सदैव नमस्कार असो.

**यस्य स्मरणमात्रेण मन:शान्तिः प्रजायते ।**
**वन्देऽहं सादरं नित्यं श्रीदत्तं भक्ततारकम् ।।७७।।**

परमपूज्य दत्त कवीश्वर महाराजांच्या फक्त स्मरणानेहि आपणास मन:शांति लाभते, अश्या त्या, आपल्यासारख्या भक्तांचे तारणहार, अश्या

सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांना आपण नित्य नियमाने नमस्कार करु या.

**यस्य दर्शनमात्रेण कृतकृत्यो भवेन्नरः ।**
**वन्देऽहं सादरं नित्यं श्रीदत्तं विश्वदेशिकम् ।।७८।।**

ज्या सद्गुरु दत्त कवीश्वर महाराजांच्या फक्त दर्शनानेच आपणास आपल्या मानव जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते त्या सद्गुरुंना कि जे आपणास ह्या जगांत जीवन कसे जगावे ह्या बाबत उपदेश करतात त्यांना सदैव नमस्कार करते / करतो.

**स्वरूपं च महद्दिव्यं ज्ञानभक्तिप्रकाशकम् ।**
**वन्देऽहं सादरं नित्यं श्रीदत्तं वाङमयं विभुम् ।।७९।।**

ज्या सद्गुरुंचे स्वरुप अत्यंत दिव्य असून जे ईश्वर साधनेसाठीं ज्ञानमार्ग आणि भक्तीमार्गाचा प्रचार करणारे असून अश्या प्रकारचे संस्कृत वाङमय निर्माण करणारे विभूति आहेत, त्या सद्गुरु श्री दत्तमहाराजांना आपण रोज प्रणाम करावा.

**सृष्टिकर्ता यथा ब्रह्मा तथाऽयं सर्जकः कृती ।**
**नमामि सादरं नित्यं श्रीदत्तं धर्मिणं परम् ।।८०।।**

ज्याप्रमाणे ब्रह्मदेवाने सृष्टिचे निर्माण केले आहे त्याचप्रमाणे पूज्य सद्गुरुंनी आपल्यासाठी सुखसोयी निर्माण करुन आपणांस कृतकृत्य केले आहे. अश्या त्या सद्गुरु श्री दत्त कवीश्वर महाराजांना आपण नमस्कार करुया, कारण ते आपले सद्गुरु आपले धर्मपालक आहेत.

**रक्षको जगतां विष्णुः तथाऽयं भक्तपालकः ।**
**नमामि सादरं नित्यं श्रीदत्तं मन्त्रदं प्रभुम् ।।८१।।**

ज्याप्रमाणे ह्या जगांत सर्व पशुपक्षी-प्राण्यांचे रक्षण भगवान श्री विष्णु करीत आहेत, त्याचप्रमाणे पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराज आपल्या भक्तांचे पालन करीत असतात, अश्या त्या सर्वभक्तांचा संभाळ करुन त्यांना मंत्रदीक्षा देणाऱ्या परमपूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांना आपण नमस्कार करुया.

**नमः श्रीदत्तरूपाय कवीश्वरपदात्मने ।**
**नमः सद्‌गुरुदेवाय नमः शान्ताय तेजसे ।।८२।।**

प्रत्यक्ष श्रीदत्त स्वरूप असणाऱ्या आणि उच्च कोटीचा आत्मा असणाऱ्या व त्यामुळेच त्यांनी धारण केलेल्या आणि तेजस्वी देह असणाऱ्या पूज्य सद्‌गुरु श्रीदत्त कवीश्वर महाराजांना आपण नमस्कार करुया.

**अमृतं चरितं यस्य निर्मलं जाह्नवीसमम् ।**
**नमामि दत्तरूपं तं योगिनं चिरंजीविनम् ।।८३।।**

ज्यांचे जीवन गंगानदीसारखे निर्मळ आहे आणि ज्यांचे चरित्र अमृतासारखे पवित्र आहे त्या चिरकाल योगीस्वरुप श्रीदत्त कवीश्वर महाराजांना आपण नमस्कार करुया.

**प्रज्ञा ऋतंभरा यस्य पुण्यश्लोकः सदाग्रणीः ।**
**नमामि दत्तरूपं तं सानन्दं भक्तवत्सलम् ।।८४।।**

ज्यांची असामान्य बुध्दिमत्ता सर्व सत्य जाणणारी आहे आणि जे सर्व सत्यस्थितितल्या संतपुरुषांमध्ये उच्च स्थान पावलेले आहेत. अश्या त्या सदा आनंदी आणि आपल्यासारख्या भक्तांवर सदैव प्रेम करणाऱ्या पूज्य श्री दत्त कवीश्वर महाराजांना आपण नमस्कार करुया.

**इत्येषा वाङ्मयी पूजा श्रीमद्दत्तपदाम्बुजे ।**
**अर्पिता तेन श्रीदत्तः प्रीयतां मे कवीश्वरः ।।८५।।**

ही मी लिहिलेली, संस्कृत शब्द–व्याकरणाच्या मदतीने केलेली, परमपूज्य श्रीदत्त कवीश्वर महाराजांची वाङमय पूजा त्यांच्या चरणी अर्पण करते आणि त्यांनी मी रचलेली ही अक्षरपूजा स्वीकारावी अशी श्रीदत्त कवीश्वर महाराजांच्या चरणी प्रार्थना करते.

**।। श्री गुरुदेवदत्त ।।**